सकाळ मंगळवार, १९ जून २०१२

# औरंगाबाद TODAY



**वनअधिकारी अद्यापही संभ्रमा**

गौताळा अभयारण्यात युवक काँग्रेसच्या
कोणता गुन्हा दाखल करावा, असा प्रश्
पडला आहे. त्यामुळे गुन्हा दाखल करप
वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांनी सोम
पूरणवाडीच्या विश्रामगृहाच्या परिसरात

पान ८

# दीड हजार झाडे लावण्याची 'एसबीआय'ची तयारी

**सकाळ बातमीचा परिणाम**

औरंगाबाद, ता. १७ : शहरातील एसबीआय बँकेच्या अधिकाऱ्यांनी वीस वर्षे जुनी असलेल्या झाडांची कत्तल केल्यानंतर बँक अधिकाऱ्यांनी या प्रकरणी भरपाई करण्याचे ठरविले असून शहरात दीड हजार झाडे लावणार असल्याचे त्यांनी सोमवारी (ता.१७) महापौर अनिता घोडेले यांना दूरध्वनीवरून सांगितले.

शासनातर्फे वृक्षसंवर्धनासाठी कोट्यवधी रुपये खर्च करीत असताना शहरातील जळगाव रोडवर असलेल्या बँकेच्या प्रशिक्षण केंद्रामधील झाडांची कत्तल करण्यात आली होती. या प्रकरणी बँकेचे अधिकारी दिनकर देशपांडे यांनी महापौर अनिता घोडेले यांना "बँकेच्या माध्यमातून शहरात दीड हजार झाडे, तसेच एक हजार ट्री गार्ड लावण्यात येणार आहेत," असे दूरध्वनीवरून सांगितले.

**विविध संघटना, संस्थांचा निषेध**

स्टेट बँक ऑफ इंडियातर्फे एन-७ येथील प्रशिक्षण केंद्राच्या परिसरातील १२ निलगिरीच्या झाडांची बेसुमार तोड करण्यात आली. या घटनेचा शहारात निषेध करण्यात येत असून, विविध संस्था, संघटना या विरोधात एकवटल्या आहेत.

शहरातील जळगाव रोडवर असलेल्या एसबीआयच्या प्रशिक्षण केंद्राच्या उद्यानामध्ये प्रशासनाने कुठलाही विचार न करता रविवारी (ता. १७) बारा झाडांची बेसुमार कत्तल केली. यासाठी नियमाने परवानगी घ्यावी लागते, याचेही भान संबंधित अधिकाऱ्यांनी ठेवले नाही. उद्यानामध्ये संरक्षक भिंतीच्या लगत ओळीने कुठलाही त्रास नसलेली झाडे बुंध्यापासून छाटण्यात आली. 'सकाळ'ने तातडीने दखल घेऊन महापौर अनिता घोडेले यांच्याकडे तक्रार केल्याने काही झाडे वाचण्यास मदत झालेली आहे. ही वृक्षतोड सुरू असताना जागरूक नागरिक अरुण बेळवणकर यांनी माहिती दिली. ऑल इंडिया स्टुडन्ट फेडरेशनच्या कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त करून प्रशिक्षण केंद्राच्या समोरच निदर्शने केली. या

पान ७ वर »


औरंगाबाद TODAY
पंधरा हजारांत बारा निलगिरीच्या झाडांचा खुर्दा!

**महापालिकेसमोर मू**

एसबीआय बँकेच्या अधिकाऱ्य
या घटनेच्या विरोधात इको नि
मंगळवारी (ता. १९) दुपारी बा
पट्टी बांधून मूक निदर्शने करण्य
अध्यक्ष प्रा. प्रियानंद आगळे य
शहरातील पर्यावरण प्रेमींनी मोठ
असे आवाहन उपाध्यक्ष रोहित
धनंजय रायबोले, अनिल उबाळे
दंडे, विनय सरवदे, अभिषेक गे
खोतकर, सुमित उबाळे यांनी वे